नियमीत फौ. ख. क्र.१०६/२०२४
सरकार -वि.- संदिप व इतर
नि.क्र. १२.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.४ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - प्रफुल विश्वनाथ माहुरे,
वय ४८ वर्षे, व्यवसाय – सहाय्यक फौजदार,
राहणार - पोलीस स्टेशन भिवापूर ता. भिवापूर, जि. नागपूर.

<u>**सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एस.मोरे यांचे मार्फत**</u>

१. मी आरोपींना ओळखतो. त्यापैकी एक आज न्यायालयात हजर आहे. दिनांक १९.०५.२०२४ रोजी मी पोलीस स्टेशन भिवापूर येथे पोलीस हवालदार म्हणून कार्यरत होतो. मी त्यादिवशी ए.पी.आय. जयप्रकाश निर्मल साहेब, पो.शि. स्वप्नील ठाकरे, पो.शि. वासुदेव समर्थ यांच्यासह पोलीस स्टेशन परिसरात पेट्रोलींग करीत होतो. त्यावेळी मुखबीरव्दारे खबर मिळाली की, एक निळ्या रंगाचा टिप्पर विना परवाना रेती घेऊन जाणार आहे. त्यानंतर मी दोन पंचांना समन्स दिला. आता मला दाखविलेला समन्स तोच आहे. त्यावर माझी व पंचांची सही आहे. त्यास **नि.क्र.१३** देण्यात येते. त्यानंतर आम्ही तास गावाजवळ सकाळी ९.०० वा. दरम्यान नाकाबंदी केली असता तेथे एक टिप्पर येताना दिसला, त्याला थांबवून त्याचे चालकाकडे विचारपूस केली व टिप्परची पाहणी केली. त्या टिप्परचा क्र. एम.एच.४०-बी.एल.६१९१ असा होता. त्या टिप्परच्या पाहणीच्या दरम्यान त्यामध्ये ६ ब्रास रेती आढळून आली. चालकाला परवान्याबाबत विचारता त्याने नकार दिला. त्यानंतर मी घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा तयार केला. आता मला दाखविलेला घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा तोच आहे. त्यावर माझी व पंचांची सही आहे. त्यास **नि.क्र.१४** देण्यात येते. त्यानंतर ट्रक घेऊन स्वप्नील ठाकरे हे पोलीस स्टेशनला गेले व फिर्याद दिली. पोलिसांनी माझे बयान घेतले होते.
सरतपास संपला.

<u>**उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री नागोशे यांचे मार्फत**</u>

२. हे म्हणणे खरे आहे की, नाकाबंदी केल्यास त्याची नोंद स्टेशन डायरीला केली जाते. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनेच्या दिवशी टि पॉईंट वर वाहतुक ड्युटीवर नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचांना नोटीस दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचासमक्ष घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा तयार केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक ०९.०४.२०२६

स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.